भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.२८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०४/२०१७

**१) संगनमत करून बेकायदेशीर रित्या अडवुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दि. १९/०४/२०१७ चे १९.०० वा.दरम्यान यातील फिर्यादी वय २२ वर्ष ही सायकलने लाखनी वरून मेंढा येथे एकटी जात असल्याचा सुना मौका पाहुन यातील आरोपितांनी संगनमत करून तिचा छुपा पाठलाग केला व तिला बेकायदेशिर रित्या अडवुन तिची रूची नसतांना देखील पाठलाग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,३५४ (ड) (१) (फ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा.सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) ट्रक चालकाने ट्रक माहामार्गावर,रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभा केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०४/२०१७ चे २१०० वा.दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक माहामार्गावर उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहणांना रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभा करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.नि.चकाटे पो.स्टे. लाखनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ,लाथाबुक्यांनी, काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/४/१७ चे २१०० वा. दरम्यान यातिल फिर्यादी हा घरी जेवन करित असता व दारू पाणी पिवुन बडबड,जोरजोरात बोलत असता यातील आरोपी याने शिवीगाळ करतो म्हणुन फिर्यादीस घराबाहेर नेवुन लाथाबुक्यांनी मारपिट करून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी टेकचंद ज्ञानेश्वर वालदे वय २६ वर्ष रा.आंधळगाव यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बाभरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४ सार्वजनिक नळाचे पाणी भरण्याच्या कारणावरून भांडण शिवीगाळ,ढकलढुकल करून काठीने मारहान करून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०४/२०१७ चे ०६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची पत्नी घराजवळील सार्वजनिक नळावर पाणी भरण्यास गुंड घेवुन गेली व नळाला गुंड लावला असता आरोपी क्र. १ याने तिला माझा पाणी भरण्याचा नंबर आहे तुने माझा गुंड बाजुला का केले या कारनावरून तिला शिवीगाळ करून दोन्ही आरोपितांनी संगनमत करून फिर्यादी सोबत लाकडी काठीने मारहान केले व त्याचे पत्नीला ढकलढुकल केल्याने फिर्यादी सोमराज सहादेव झुंबळे वय ३४ वर्ष रा. मांगली यांचे दिनांक १६/४/१७ ला दिलेली रिपोर्ट,वैदयकीय रिपोर्ट व आज रोजी पो.स्टे. ला प्राप्त झालेली सि.टी.स्कॅन रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३२३,५०४,३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना.चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :–**

दिनांक २०/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,जवाहरनगर,मोहाडी,कारधा,तुमसर, सिहोरा,गोबरवाही,साकोली,लाखनी,पवनी,येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १७१ लिटर हा.भ.दारू + २८० के.जी. सडवा मोहा किंमती २७,१००/–रु, १४ लिटर २२० मीलीलीटर देशी दारू किंमती ३,९५०/रू. तसेच जुगारातुन २७२/–रू.चा माल जप्त करून,असा एकुण किंमती ३१,३२२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.